ॐ जय श्रीराम समाजसेवा संस्था संचलित,
जय श्रीराम कॉलेज ऑफ एज्युकेशन (बी.एड.)
मु.पो. शिक्रापूर, ता. शिरूर, जि. पुणे - ४१२२०८
(N.C.T.E. Code No. APW-06187/123766) ID No. PU/PN/EDU/416/2019
Ph. 02138-287336, Mob. 8888883502, 9881482222
Website: www.jaishriramcollege.com E-mail : omjaishriram@gmail.com
College Code : 1288
॥ विद्या विनयन् शोभते ॥

जावक क्र. JSCE/समक्ष/2023 दिनांक : 08/07/2023

# REPORT- LOCAL COMMUNITY BASE ACTIVITY

संरक्षित पाण्यासाठी वनराई बंधारे उपक्रम जय श्रीराम बी.एड महाविद्यालयाच्या वतीने

दिनांक ०८ जुलै २०२३ रोजी शिक्रापूर परिसरात आयोजित करण्यात आला.

कृषी सहाय्यक श्री. अशोक जाधव यांच्या पुढाकाराने आणि मार्गदर्शनाखाली बी.एड चे विद्यार्थी

आणि प्राध्यापक यांच्या उपस्थितीत या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

एकूण ६३ विद्यार्थ्यांनी यात सहभाग नोंदवला.

Principal
Jai Shriram College of Education (B. Ed.)
(Shikrapur) Tal. Shirur. Dist. Pune

# Jai Shriram College of Education (B.Ed.), Shikrapur.

Tal – Shirur Dist. – Pune. 412208

## सूचना

५ जुलै २०२२

सर्व प्राध्यापक आणि विद्यार्थ्यांना कळविण्यात येते की दिनांक ८ जुलै २०२२ रोजी शिक्रापूर परिसरामध्ये पर्यावरण दिनाचे औचित्य साधून संरक्षित पाण्यासाठी वनराई बंधारे उपक्रम जय श्रीराम बी.एड महाविद्यालयाच्या वतीने आयोजित करण्यात येत आहे .

तरीही सर्व प्राध्यापकांनी आणि बी.एड प्रथम वर्ष आणि द्वितीय वर्षाच्या विद्यार्थ्यांनी या उपक्रमात सहभागी होण्यासाठी सकाळी ठीक ०९.०० वाजता महाविद्यालयामध्ये उपस्थित राहावे.

# संरक्षित पाण्यासाठी वनराई बंधारे गरजेचे : जाधव



**समर्थ भारत वृत्तसेवा**

**शिक्रापूर ता. ८ :** पाण्याची समस्या लक्षात घेता नागरिकांनी पाणी अडवून पाणी जिरवण्याची प्रक्रिया करण्यासाठी पुणे येण्याची गरज निर्माण झालेली असून पाण्याचे संरक्षण करणे काळाची गरज झाली असताना संरक्षित पाण्यासाठी नागरिकांनी श्रमदानातून वनराई पद्धतीचे बंधारे गरजेचे असल्याचे प्रतिपादन कृषी सहाय्यक अशोक जाधव यांनी केले आहे.

शिक्रापूर (ता. शिरूर) येथे महाराष्ट्र शासन कृषि विभागाच्या मार्गदर्शनाखाली ओम जय श्रीराम समाजसेवा संचालित जय श्रीराम महाविद्यालयच्या विद्यार्थ्यांनी केलेल्या श्रमदानातून कृषी सहाय्यक अशोक जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली वनराई बंधारा बांधण्यात आला. याप्रसंगी संस्थेचे अध्यक्ष कृष्णाजी विरोळे पाटील, प्राचार्य डॉ. अर्चना देसाई, प्रा. संदीप राऊत, प्रा. अविनाश कामठे, प्रा. अपर्णा मेटे उपस्थित होते.

वनराई बंधाऱ्यामुळे जवळील विहिरीचा पाणीसाठा वाढण्यास मदत होणार आहे तसेच सध्या पावसाळा संपला असल्याने ओढे नाले यामधील वाहून जाणारे पाणी अडवून पिकांना संरक्षित सिंचन देणे तसेच जनावरांना पिण्याचे पाणी उपलब्ध होण्यासाठी आणि पाणी साठ्यामधून पाण्याचा उपसा करून रब्बी व उन्हाळी हंगामात भाजीपाला व कडधान्य पिके घेण्यासाठी वनराई बंधारे गरजेचे असल्याचे देखील कृषी सहाय्यक अशोक जाधव यांनी सांगितले, तर पुढील काळात महाविद्यालयाच्या पुढाकाराने मोठ्या प्रमाणात वनराई बंधारे निर्माण करणार असल्याचे संस्थेचे अध्यक्ष कृष्णाजी विरोळे पाटील यांनी सांगितले.



